पावसा पावसा ये ये
धडाड धुम होऊ दे
शेती-भाती पिकल्यावर
छान ऊन पडू दे.

पावसा पावसा ये ये
संततधार कोसळू दे
झाडांनी पाणी प्यायल्यावर
छान ऊन पडू दे.

पावसा पावसा ये ये
झिमझिम पाणी पडू दे
नदी-तळी भरल्यावर
छान ऊन पडू दे.